# उल्हासनगर महानगरपालिका

**वैद्यकिय आरोग्य विभाग**

(कार्यालय दुरध्वनी क्र. 0251-2720116 विस्तारीत क्र. 208/241)

वेटी बचाओ
save the girl child

---

**जा.क्र.उमपा/साप्रवि/आस्था/मुली/१५७ /२०२२, दिनांक २१ /०४/२०२२**

## -: शुध्दीपत्रक :-

**थेट मुलाखत (WALK IN INTERVIEW)**

कोव्हीड-१९ प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे संदर्भात उल्हासनगर महानगरपालिका अंतर्गत नागरी आरोग्य केंद्र १ ते ६ व उमपा मुख्यालय येथे वैद्यकीय अधिकारी या पदावर ०६ महिन्यासाठी तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करावायाची आहे. वैद्यकीय आरोग्य या पदासाठी पात्र व इच्छुक उमेदवारांची दि. २८ /०४/२०२२ रोजी सकाळी १०.०० वाजता थेट मुलाखत (WALK INTERVIEW) आयोजित करण्यात आलेली असुन पात्र व इच्छुक उमेदवारांनी मुलाखतीस उपस्थित रहाणेबाबत दिनांक १४/४/२०२२ रोजी जाहिरात उल्हासनगर महानगरपालिका नोटीसबोर्ड आणि www.umc.gov.in यासंकेत स्थळावर व वर्तमानपत्रात जाहिरात क्र. उमपा/पिआरओ/१८०/२०२२, दिनांक १३/४/२०२२ नुसार प्रसिध्द करण्यात आली होती. सदर जाहिरातीमध्ये अंशत: सुधारणा करण्यात येत आहे.

कोव्हीड-१९ अंतर्गत भरती करण्यात येणा-या वैद्यकीय अधिकारी यांचे वेतनात व राष्ट्रीय शहरी आरोगय अभियान यांच्या वेतनामध्ये सु-सुत्रता व समानता येण्यासाठी खालील तक्तयातील स्थंभ क्र. ४ व ६ मध्ये सुधरणा करण्यात येत आहे. त्याप्रमाणे वाचावे.

| अ.क्र | पद | शेक्षणिक पात्रता | संख्या | मासिक मानधन/ठोक वेतन रुपये | सुधारणा केलेले मासिक मानधन/ठोक वेतन रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | वैद्यकीय अधिकारी | • **MBBS/** BHMS/BAMS/ BDS/ AYUSH **या प्रमाणे पदवीधर असावे.**<br>• **कोव्हिड-१९ साथरोग महामारीत काम केल्याचे अनुभव असल्यास प्रथम प्राधान्य देण्यात येईल. (उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये काम केले असेल असे उमेदवार)** | **१) MBBS –०७**<br>**२) BAMS/BHMS** /BDS – १२<br>**३) War Roum साठी खालील डॉक्ट BAMS/ AYUSH / BHMS - ०४** | **रु. १,००,०००/-**<br>**रु. ७५,०००/-**<br>**रु. ५५,०००/-** | **रु. ६०,०००/-**<br>**रु. ५५,०००/-**<br>**रु. ४५,०००/-** |

टिप् :- उर्वरीत जाहिरती मधील अटी शर्ती कायम रहातील. ( क्र. उमपा/ पिआरओ/१८०/२०२२, दि.१३/४/२०२२)

जा.क्र.उमपा/ /२०२२

दिनांक :- /०४ /२०२२

उप आयुक्त (मुख्यालय)
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

## वैद्यकिय आरोग्य विभाग

(कार्यालय दुरध्वनी क्र. 0251-2720116 विस्तारीत क्र. 208/241)

बेटी बचाओ
save the girl child

---

**जा.क्र.उमपा/साप्रवि/आस्था/मुली/१४७ /२०२२, दिनांक १३ /०४/२०२२**

## -: जाहीरात :-

### थेट मुलाखत (WALK IN INTERVIEW)

कोव्हीड-१९ प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे संदर्भात उल्हासनगर महानगरपालिका अंतर्गत नागरी आरोग्य केंद्र १ ते ६ व उमपा मुख्यालय येथे वैद्यकीय अधिकारी या पदावर ०६ महिन्यासाठी तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करावायाची आहे. वैद्यकीय आरोग्य या पदासाठी पात्र व इच्छुक उमेदवारांची दि.२४/०४/२०२२ रोजी सकाळी १०.०० वाजता थेट मुलाखत (WALK INTERVIEW) आयोजित करण्यात आलेली आहे. तरी पात्र व इच्छुक उमेदवारांनी मुलाखतीस उपस्थित रहावे.

| अ.क्र | पद | शेक्षणिक पात्रता | संख्या | मासिक मानधन/ठोक वेतन रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी | • MBBS/ BHMS/BAMS/ BDS/ AYUSH या प्रमाणे पदवीधर असावे.<br>• कोव्हिड-१९ साथरोग महामारीत काम केल्याचे अनुभव असल्यास प्रथम प्राधान्य देण्यात येईल. (उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये काम केले असेल असे उमेदवार) | MBBS –०७<br>MBBS/ AYUSH / BDS – १२<br>War Roum साठी खालील डॉक्ट BAMS/ AYUSH / BHMS - ०४ | रु. १,००,०००/-<br>रु. ७५,०००/-<br>रु. ५५,०००/- |

- <u>अर्ज स्विकारण्याचे ठिकाण :- अग्निशमन विभाग, महापालिका मुख्यालयाच्या मागे, उल्हासनगर- 3</u>
- <u>मुलाखत दिनांक :- २४०४/२०२२</u>
- <u>अर्ज स्विकारण्याची वेळ :- सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० वाजेपर्यंत (सदर कालावधीनंतर अर्ज स्विकारले जाणार नाही. तसेच थेट मुलाखत दुपारी २.०० ते ५.०० वाजेपंत घेण्यात येईल)</u>

**अटी व शर्ती :-**

१) सदर जाहिरात ही प्रारुप गुणवत्ता यादी तयार करुन आवश्यकतेप्रमाणे म्हणजेच महापालिकेला गरज भासेल त्या प्रमाणे प्रारुप गुणवत्ता यादीमधुन कंत्राटी पध्दतीने आवश्यक संख्येने पदांच्या नियुक्त्या करण्यात येतील.

२) उपरोक्त पदांकरिता कालावधी ६ महिने किंवा कोरोना (कोविड-१९) चा प्रादुर्भाव संपेपर्यत, जे आधी घडेल तोपर्यंत.

३) क्षेत्रीय स्तरावर सामाहितक बांधिलकीने काम करण्याची आवड असावी तसेच शारीरिक दृष्टटया काम करयास सक्षम आसावा.

४) मासिक माधनाबाबत वाटाघाटीनंतर निश्चित करण्यात येईल.

इतर अटी व शर्ती

१) सदरची नेमणूक तात्पुरती असल्याने उमेदवारांची निवड स्थानिक परिस्थिती व गरजेनुरुप करण्यात येणार आहे. याबाबत कोणतीही विचारणा दुरध्वनीवर करण्यात येऊ नये.

२) जिल्हा सीमा बंदी व वाहतूक बंदी विचार करता उमेदवार हा उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात राहणार असल्यास त्यास प्राधान्य देण्यात येईल.

३) वयोमर्यादा : खुल्या प्रवर्गातील उमेदवाराचे वय जाहिरातीचे दिनांकास ३८ वर्षा पेक्षा जास्त नसावे. व मागास वर्गीय उमेदवारांसाठी वयोमर्यादा ५ वर्षां नी शिथिल असेल. प्रतिसाद कमी असेलत्या पदांसाठी सदर अटी शिथिल करण्याचा अधिकार मा. आयुक्त सो. यांना राहील.

४) वरील शैक्षणिक पात्रता व अनुभव आवश्यक राहील.

५) नियुक्त उमेदवारांना कोव्हिड-१९ रुग्णाची सेवा करणे अनिवार्य राहील.

६) सदरचे पद संपुर्ण पणे कंत्राटी स्वरुपाचे आहे.

७) सदर पदाच्या कंत्राटी नुमणुका (Objective assessment) पध्दतीने वॉक ईन इंटरव्युव्दारे करण्यात येतील.

८) उमेदवारांनी पात्रता व अनुभवाच्या मुळ कागदपत्रासह एक पासपोर्ट आकाराचा फोटो व आवश्यक मुळ कागदपत्राच्या छायांकित सत्यप्रतीचा एक संच घेदुन थेट मुलाखतीस हजर राहणे आवश्यक आहे. प्राथमिक कागदपत्रांच्या छाननी नंतर पात्र ठरणाऱ्या उमेवारांच्या मुलखाती घेण्यात येतील, मुलाखातीसाठी पात्र उमेदवारांची संख्या खुप मोठया प्रमाणात असेल तर त्या पात्रउमेदवाराच्या किमान शैक्षणिक अर्हते च्या शेवटच्या वर्षाच्या गुणा नुसार गुणवता विचारात घेवुन १:२ या प्रमाणात मुलाखती घेण्यात येतील.

९) उमेदवारांची जन्म तारखेचया पुराव्यासासठी जन्मतारखेचा दाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखल्याची साक्षांकित प्रत अथवा जन्म तारखेची नोंद असलेली शालांत परिक्षेच्या उत्तीर्ण सर्टिफिकेटची च साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक.

१०) उमेदवार मागास वर्गीय असल्यास जातीचा स्पष्ट उल्लेख करुन कोणत्या प्रवर्गात मोडत आहे. याचा उल्लेख करावा.

११) अर्जदार महिला असल्यास विवाह नोंदणी प्रमाण पत्र जोडणे आवश्यक आहे. (शासनमान्य)

१२) विहित पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज पुर्ण किंवा चुकीचे भरलेले अर्ज, वय, शैक्षणिक अर्हता, गुणपत्रक, जातीचा दाखला, अनुभव इत्यादी संदर्भातील आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित सत्यप्रती (through copy) जोडलेले नसलेले अर्ज अपात्र समजण्यात येतील.

१३) निवड झालेल्या उमेदवारांनी विहित नमुन्यात करारनामा करुन दिल्यानंतर कंत्राटी पध्दतीने नेमणुक दिली जाईल.

१४) येणऱ्या उमेदवारांनी मुलाखती साठी स्वखर्चा ने उपस्थित राहावे लागेल.

१५) वरील पदे हे संपुर्णपणे कंत्राटी स्वरुपाचे असल्याने या पदावर कायम स्वरुपाची नियुक्ती मागण्याचा हक्क असणार नाही.

१६) प्रारुप गुणवत्ता यादी (पॅनल) मधून नियुक्ती करण्यात येणाऱ्या उमेदवारांना ४८ तासां मध्ये रुजू होणे आवश्यक राहील.

१७) वरील पदासाठी कामाचे स्वरूप ठरविण्याचे अधिकार विभागप्रमुखांना राहतील.

१८) सदर पदांना दररोज आठ तसा (रुग्णालय सोईनुसार) सेवा देणे बंधकारक असेल तथापि,पदाची कामकाजाची वेळ निश्चित करण्याचे अधिकार विभाग प्रमुख यांचे असतील.

१९) अपात्र ठरवलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यव्हार केला जाणार नाही.

२०) बोलवलेल्या उमेदवारांस नियुक्ती देणेबाबतचे सर्व अधिकार मा. महापालिका आयुक्त यांनी स्वत: कडे राखुन ठेवलेले आहेत. या बाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

२१) पदांच्या संख्येत कमी / जास्त बदल होण्याची शक्यता आहे त्या बाबत अर्जदाराला कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही. मुलाखत स्थगित करणे व रद्द करणे अंशत: बदल करणे या बाबतचे सर्व अधिकार आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका उल्हासनगर हे स्वत: कडे राखुन ठेवतील. या बाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

२२) महापालिकेच्या आस्थापनेवरील नियमीत कर्मचा-यांच्या लाभदायी योजना कंत्राटी कर्मचा-यांना लाभ होणार नाही. तथापी शासनाच्या कोव्हिड-१९ अंतर्गत आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे दिनांक ०८/०४/२०२० च्या तरतुदी नुसार ५० लक्ष विमा योजनेचा लाभ कंत्राटी कर्मचा-यांना देखील शासन अटी नुसार लागु असेल.

२३) निवडीच्या कोणत्या ही टप्प्यावर अर्जदार अहर्ताधारण करीत नसल्यास आढळल्यास, गैरवर्तण करतांना आढळल्यास दबावतंत्राचा वापर करतांना आढळल्या उमेदवारी आपोआप रद्द होईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पुर्वसुचना ना देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

२४) निवड झालेल्या उमेदवारास सेवेतू रुजू होण्यापूर्वी एका महिण्याचे मानधन अमानत रक्कम म्हणुन भरावे लागेल व त्या वर कोणत्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

२५) राजीनामा सादर न करता परस्पर काम सोडून गेल्यास मानधन कपात करण्यात येईल.

२६) नियुक्ती संदर्भात अंतिम अधिकार अध्यक्ष तथा आयुक्त उल्हासनगर महानगरपालिका यांना राहतील आणि निवड/नियुक्ती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर, कोणतेही कारण न देता बदल अथवा रद्द करण्याचे अधिकार त्यांनी राखून ठेवले आहे.

२७) मुलाखतीसाठी जास्त उमेदवार/अर्ज प्राप्त झाल्यास मुलाखती दुस-या दिवशी सकाळी ११.०० वाजेपासुन घेण्यात येतील.

२८) सदर जाहिरात उल्हासनगर महानगरपालिका नोटीसबोर्ड आणि www.umc.gov.in यासंकेत स्थळावर उपलब्ध असून, सदरहू भरती प्रक्रीये संदर्भात अधिक मा हिती सदरहू संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

जा.क्र.उमपा/ /२०२२

दिनांक :- / ०४ /२०२२

उप आयुक्त (मुख्यालय)
उल्हासनगर महानगरपालिका